प्रेस नोट, दिनांक :- १५/०९/२०१७

## भोसरी पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई

भोसरी पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम आलम युसूफ शेख, वय २४ वर्षे, रा.शेख बिल्डींग, वरूण हॉटेल जवळ, कासारवाडी, पुणे. हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. नमुद इसमाने त्याचे साथीदारांसह भोसरी व हिंजवडी पोलीस ठाणे परिसरात पिस्टल, तलवार, लोखंडी रॉड, चामडी पट्टा यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, पळवून नेणे इ. सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन- २०१० पासून चालू आहेत. नमूद इसमास एक वर्षाकरीता पुणे शहर व लगतच्या जिल्हयातून हद्दपार करुनसुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. अशाप्रकारे नमुद गुन्हेगाराचे दहशतीमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती.त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसानीचे भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह-आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. अजय भोसले, भोसरी पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. तद्नंतर **श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचे विरुध्द दिनांक १५/०९/२०१७ रोजी एक वर्षाकरीता स्थानबध्द आदेश पारीत केले आहेत.** त्यानुसार त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येणार आहे.

गेले सात महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या चौदा इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.

---००----